पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी -१७
क्र.डक्षेका/१/कावि/ १०८ / १४,
दिनांक - ३१/०१/२०१४.

**विषय – ड क्षेत्रिय कार्यालयाचे कामकाजाबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९अ अन्वये मा.आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्र.प्रशा।२।कावि।४१।२०१४ दिनांक - २१।०१।२०१४ व आदेश क्र. प्रशा।२।कावि।४२।२०१४ दिनांक – २१।०१।२०१४ चे आदेशान्वये पुर्वीच्या ४ प्रभाग समिती व्यतिरिक्त नव्याने आणखी २ प्रभाग समित्यांची निर्मिती व प्रभाग कार्यालयाचे नांव क्षेत्रिय कार्यालय असे करणेत येवून त्यासोबत वर्ग १ ते ४ अधिकारी / कर्मचारी यांच्या त्या-त्या क्षेत्रिय कार्यालयात नेमणुका करणेत आलेल्या आहेत. तसेच आदेश क्र. प्रशा।१।कावि।६३।२०१४ दिनांक – २१।०१।२०१४ अन्वये क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील वाचनालये, ग्रंथालये, व प्रेक्षागृहांचे कामकाज क्षेत्रिय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली सोपविण्यात आलेले आहे. त्यानुसार ड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रशासन, स्थापत्य, विद्युत, पा.पू. व आरोग्य विभागाकडील लिपिक व मुख्य लिपिक कर्मचा-यांना इकडील आदेश क्र. डप्र।१।कावि।१०७।२०१४ दिनांक – ३१।०१।२०१४ अन्वये नव्याने कामकाजाचे फेरवाटप करणेत आलेले आहे. तसेच मा.आयुक्त सो. कार्यालयीन कामकाजाचे नस्तीचा स्तर यापुर्वीच ठरविणेत आलेला आहे. त्यानुसार कामकाज करणे आवश्यक आहे.

सबब या आदेशान्वये सर्व शाखाप्रमुखांना आदेशित करणेत येते की, आपले अखत्यारितील अस्थापनाविषयक कामकाज, पेन्शन प्रकरण, पारपत्र प्रमाणपत्र, अति.भत्ता अदा करणे,वैद्यकीय अँग्रिम मंजुरीबाबत, निविदा विषयक कामकाज व इतर कामकाज क्षेत्रिय अधिकारी यांचेकडे सादर करताना **प्रशासकीय कामकाज हे प्रशासन अधिकारी यांचेमार्फत व आर्थिक विषयक कामकाज लेखाधिकारी यांचेमार्फत सादर करणेत यावे. तसेच यापुढे कार्यालयीन कामकाज करताना प्रभाग कार्यालयाऐवजी क्षेत्रिय कार्यालय असा उल्लेख करणेकामी संबंधितांना सुचना देणेत याव्यात.**यामध्ये कोणत्याही प्रकारचा कसूर झालेचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(२) नुसार कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याबद्दल संबंधितांना जबाबदार धरणेत येऊन शिस्तभंगाची कडक कारवाई करणेत येईल. याची सर्व संबंधितानी स्पष्टपणे नोंद घेणेत यावी.

**क्षेत्रिय अधिकारी**
**पि.चि.म.न.पा. ड क्षेत्रिय कार्यालय**
**रहाटणी – १७.**

प्रति,
सर्व संबंधित.